**क्र.का.५/रिफंड/कोर्ट फी सर्टीफिकेट/१९८४**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे**
**दिनांक :- २६/१०/१९९०.**

**विषय :- कोर्ट फी सर्टीफिकेट परताव्याबाबत कार्यपध्दती.**

**प रि प त्र क :-**

मुंबई कोर्ट फी ॲक्ट १९५९ चे कलम १७ अ अनुसार देण्यात येणाऱ्या रिफंड सर्टीफिकेटच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यपध्दती ठरविण्यात येत आहे.

१) **रिफंड** सर्टीफिकेटमध्ये भरलेली माहिती पूर्ण असावी व सर्टीफिकेटची मूळ प्रत असावी. कोर्टाचा गोत शिक्का असावा. कोर्टाच्या पदसिद्ध अधिकाऱ्यांकडून स्वाक्षांकित केलेले व हुद्दयाच्या शिक्का मारलेला आहे का याची खात्री करावी.

२) **रिफंड** अर्जास कोर्ट फी तिकिटाची आवश्यकता नाही.

३) **रिफंड** रक्कमेची मर्यादा नसल्याने मुद्रांक जिल्हाधिकारी कितीची रकमेचा परतावा देऊ शकतील.

४) **जिल्हा** कोर्टाकडून दरमहा कोर्ट फी परतावा विवरणपत्रे येतात, त्यांची पडताळणी करून कोर्ट फी परतावा देण्यात यावा व असा परतावा दिल्यानंतर लाल शाईने विवरणपत्रावर त्यांची नोंद घ्यावी.

५) **ज्याच्या** नावाने रिफंड आहे त्याच व्यक्तीने अर्ज केला पाहिजे. अथवा अधिकारपत्र अर्जासोबत दाखल केले पाहिजे.

६) **रिफंड** सर्टीफिकेटचे परताव्याबाबत स्वतंत्र परतावा/रजिस्टर ठेवण्यात यावे.

७) **रिफंड** सर्टीफिकेट परतावा ६ वर्षापर्यंत देण्यात यावा.

८) **कोर्ट** फी रिफंड सर्टीफिकेट अर्ज प्राप्तीपासून व कोर्टाचे विवरणपत्र प्राप्त असल्यास १५ दिवसांत देण्यात यावे.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही /-**
**(के.जे.सातदिवे)**
**नोंदणी महानिरिक्षक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करीता.**

प्रत,

**१) सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी(सर्व) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी, २) नोंदणी उप उपनिरीक्षक(सर्व) ३) मुद्रांक अधिक्षक, मुंबई ४) मा. जिल्हा न्यायाधीश (सर्व) यांना माहितीकरिता तसेच अग्रेषित, २) कार्यासन अधिकारी (सर्व) नों.म.नि.का.पुणे.**